


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ३, अंक ३ | जुलै २०२२ (क्र.१०)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेचे निमित्त

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य ४

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात यंदा शेकरूंच्या संख्येत घट

काटेपूर्णा अभयारण्य ४

काटेपूर्णा अभयारण्याबाहेर आढळला वाघाचा मृतदेह

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ४

गौताळ्यातील तस्कर, शिकाऱ्यांवर कारवाईबाबत गांभीर्याचा अभाव

बुद्धपौर्णिमेच्या गणनेत गौताळ्यात ३८० प्राण्यांचे दर्शन

ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य ५

स्थलांतराचा मागोवा घेण्यासाठी ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यातील सहा पक्ष्यांना अंकन

ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यात यंदा फ्लेमिंगोंच्या संख्येत वाढ

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ६

ताडोबासह कमलापुरातील हत्ती गुजरातला पाठवण्यास केंद्र सरकारची मान्यता

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ७

नवेगाव नागझिऱ्यात ब्रह्मपुरीतून दोन वाघिणींचे आगमन लवकरच अपेक्षित

कोका अभयारण्यात बुद्धपौर्णिमेच्या गणनेत ६६६ वन्य प्राण्यांचे दर्शन

नान्नज अभयारण्य ८

प्राणिगणनेदरम्यान नान्नज अभयारण्यात माळढोकाचे दर्शन नाही; जुलैमध्ये मात्र मादीचे वनकर्मचाऱ्यांना दर्शन

पेंच व्याघ्र प्रकल्प ९

गळ्यातील सापळ्यातून सुटका झालेली पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघीण सुखरूप

रंगद्रव्यातील बदलामुळे वेगळी दिसणारी हरणे पेंच व्याघ्र प्रकल्पात; वनाधिकाऱ्याचा शोधनिबंध

भीमाशंकर अभयारण्य १०

भीमाशंकर अभयारण्यात प्राणिगणनेदरम्यान बिबट्याचे दर्शन नाही; सांबरे व भेकरे मुबलक

मेळघाट व्याघ्र प्रकल्प १०

अकोला ते खंडवा रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण मेळघाट गाभा क्षेत्राबाहेरील पर्यायी मार्गाने

मेळघाटातील हरणांची शिकार करणाऱ्या सात जणांवर कारवाई

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ११

विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या प्रतीक्षेत सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

चांदोली व कोयना संरक्षित क्षेत्रांतील वनपरिक्षेत्रांत ११६ गव्यांची नोंद

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १३

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी गुजरात वन खात्याकडे सिंहांची मागणी

**राज्यस्तरीय बातम्या** १३

'राज्य वन्यजीव कृती आराखड्या'च्या अंमलबजावणीसाठी संनियंत्रण समिती

राज्याकडून 'धोकाग्रस्त वन्यजीव अधिवासां'ची घोषणा; केंद्र सरकारची अंतिम मंजुरी आवश्यक
राज्यात १२ नवीन संवर्धन राखीव क्षेत्रे आणि तीन नवीन अभयारण्ये
वनाधिकाऱ्यांच्या बदल्या व पदोन्नती रखडल्याने वन विभागाच्या कामकाजावर दुष्परिणाम
समृद्धी महामार्गावर वन्य प्राण्यांसाठी केलेल्या उपाययोजनांच्या परिणामकारकतेबाबत प्रश्नचिन्ह
पश्चिम महाराष्ट्र १६
मसाई पठाराला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्याच्या निर्णयाबाबत संमिश्र प्रतिक्रिया
विदर्भ १७
विदर्भासह राज्यात यंदा २४,००० पेक्षा जास्त वणव्याच्या घटनांची नोंद
गोंदिया-चंद्रपूर रेल्वेमार्गावर पुन्हा एक व्याघ्रमृत्यू; रेल्वेचे उपाययोजनांकडे दुर्लक्ष
गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात आफ्रिकी सफारीला केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी
कोकण १९
रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर अंकन केलेली कासवे परतीच्या मार्गावर
माणूस-बिबट्या संघर्ष २०
अहमदनगर जिल्ह्यात माणूस-बिबट्या संघर्षाच्या ९८९ प्रकरणांमध्ये वन खात्याकडून ९४ लाखांची भरपाई
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त
व्याघ्र हल्ल्यातील मनुष्यहानी संक्षिप्त वृत्त २१

**राष्ट्रीय बातम्या** २१
संरक्षित वन क्षेत्रास एक किलोमीटरचे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र हवे : सर्वोच्च न्यायालय
"व्याघ्र संचारमार्गाची संलग्नता टिकवण्यासाठी भागीदारांच्या हितांविषयी संतुलन आवश्यक"

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २२
जगभरात पक्ष्यांच्या ४८ टक्के प्रजातींचे अस्तित्व धोक्यात; भारतातील पक्ष्यांची स्थितीही गंभीर

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४
माळढोक – असून अडचण, नसून खोळंबा!

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड ३, अंक ३, जुलै २०२२ (क्र. १०)**
संपादकः रेश्मा जठार
साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
साहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ता**:C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्स**ः ०२० २५६५४२३९ **ई मेल**ः marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळ**ः https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***
टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.
***
'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**
c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**
***

## संपादकीय

### बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेचे निमित्त

वर्ष २०२० मध्ये 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'ची सुरुवात झाली. तेव्हापासून गेली दोन वर्षे बुद्धपौर्णिमेची प्राणिगणना कोविड-१९च्या साथीमुळे रद्द करण्यात आली होती. यंदा राज्यातील संरक्षित क्षेत्रांमध्ये ही प्राणिगणना करण्यात आली. हे वार्तापत्र सुरू झाल्यानंतर बुद्धपौर्णिमेला झालेली ही पहिलीच प्राणिगणना.

बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेचे महत्त्व गेल्या काही वर्षांत कमी झाले आहे. वन्यजीवांचा अभ्यास, गणना करण्यासाठी नवनव्या पद्धती, तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. त्यामुळे अधिकाधिक वैज्ञानिक पद्धतीने गणना करणे शक्य झाले आहे. त्यामुळे, बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेकडे आता एक प्रथा म्हणून पाहिले जाते.

मात्र, इथे लक्षात घ्यायला हवे की या प्रथेमुळे वन्यप्राणीप्रेमी, विद्यार्थी, नवशिके वन्यजीव संशोधक ह्यांना रात्रीचे जंगल संरक्षित क्षेत्रात जाऊन अनुभवण्याची संधी मिळते. वन्य जीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र, संवर्धन आदी विषयांच्या विद्यार्थ्यांचा पुढे काम करताना वन विभागाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संबंध येणार असतो. तेव्हा वन विभागाच्या क्षेत्रीय कामकाजाचा लहानसा का होईना एक अनुभव त्यांना घेता येतो.

बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेचा आणखी एक विशेष या अंकाच्या निमित्ताने लक्षात आला आहे. बुद्धपौर्णिमेच्या प्राणिगणनेची दखल मराठी मुद्रित माध्यमांमध्ये आवर्जून घेतली जाते. त्याचा परिणाम म्हणून, या पूर्वीच्या अंकांमध्ये न आलेल्या संरक्षित क्षेत्रांमधील जसे की काटेपूर्णा आणि नान्नज अभयारण्यांतील वृत्तांकन या अंकात आले आहे. महाराष्ट्रात आढळणाऱ्या माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड), रानम्हैस (वाईल्ड बफेलो) या दुर्मीळ प्रजातींची या वार्तापत्रातील बातमी स्वरुपातील ही पहिलीच हजेरी. ही हजेरी लागण्यासाठी वार्तापत्राचे तिसरे वर्ष आणि १० वा अंक यावा लागला.

काटेपूर्णा, नान्नज अभयारण्यांबरोबर वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवनासाठी ओळखल्या जाणाऱ्या राज्यातील इतर काही ठिकाणांचा या अंकात उल्लेख आला आहे. कोलामार्का, मसाई पठार, महादरे या ठिकाणांसह अन्य काही ठिकाणांना संरक्षित क्षेत्राचा दर्जा मिळालेला नाही. त्यामुळे दखलपात्र वन्य अधिवास असूनही त्याविषयी फारसे वृत्तांकन होत नसे. मात्र, या ठिकाणांना संवर्धन राखीव क्षेत्र किंवा वन्यजीव अभयारण्याचा दर्जा मिळवून देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयामुळे या ठिकाणच्या वन्यजीवनविषयक घडामोडींची दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत अंकाबाबत आणखी एक उल्लेखनीय बाब अशी की पायाभूत सुविधांच्या रेषीय प्रकल्पांचे जसे की समृद्धी महामार्ग, अकोला ते खंडवा रेल्वेमार्ग यांचे वन्यजीवांवर होणारे दुष्परिणाम, वन्यजीव संरक्षण, संवर्धनविषयक कायदे, नियमांच्या अंमलबजावणीसाठी सरकारी पातळीवर किंवा न्यायालयीन व्यवस्थेकडून केले जाणारे प्रयत्न जसे की पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्राबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश, अंमलबजावणीबाबत विविध आव्हाने जसे की वन खात्यातील मनुष्यबळाची कायमस्वरुपी वानवा; संरक्षण-संवर्धनासाठी पर्यावरणशास्त्र समजून घेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील वैज्ञानिक समुदाय आणि या सगळ्यात वन्यजीव अधिवासांजवळ किंवा अनेक वेळा त्या अधिवासांमध्येच राहणारे स्थानिक समुदाय यांच्या विवंचना अशा सगळ्याच मुद्द्यांचे प्रतिनिधीत्त्व या अंकात आले आहे. आणि हे सर्व वृत्तांकन हे मराठी वृत्तपत्रांमधून निवडलेले आहे. बातम्या कमी आहेत किंवा त्यामध्ये पुरेसे वैविध्य नाही म्हणून इंग्रजी प्रसारमाध्यमांचा आधार घेण्याची गरज या खेपेला जाणवली नाही.

***

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य

**कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात यंदा शेकरूच्या संख्येत घट**

कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य क्षेत्रात गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा शेकरू (जाएंट स्क्विरल)ची संख्या कमी झाल्याचे गणनेत दिसून आले आहे. कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यासह लगतच्या भीमाशंकर अभयारण्य परिसरात शेकरू आढळतात. हरिश्चंद्रगड परिसरातील कोथळे, देवराई, तोलारखिंड, आंबीत, पाचनई, कुमशेत इथल्या वनांमध्ये शेकरू दिसून येतात. पावसाळ्याच्या तोंडावर शेकरू नवीन घरटी बांधतात हे लक्षात घेऊन ३० मे ते तीन जून या कालावधीत भंडारदरा व राजूर वनपरिक्षेत्रात त्यांची गणना करण्यात आली.

हरिश्चंद्रगड परिसरातील कोथळे, आंबीत, पाचनई परिसरात ४७ शेकरू दिसून आले. याशिवाय झाडांवर शेकरूंची नव्याने बांधलेली १७७ आणि जुनी १३५ घरटी आढळून आली. सोडून दिलेली ४२ घरटी दिसली. भंडारदरा पाणलोट क्षेत्रातील कोलटेंभे व रतनवाडी परिसरातील जंगलात ११ शेकरू प्रत्यक्ष दिसले आणि वापरात असलेली १९ घरटी दिसून आली.

प्रत्यक्षात ५८ शेकरू दिसले असले, तरी नव्याने बांधलेली घरटी पाहता त्यांची संख्या ७० ते ७५ असावी, असा अंदाज आहे.

गेल्या वर्षी अभयारण्यात ९७ शेकरू दिसले होते (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २, अंक ३, क्र. ६*) व त्यांची ३९६ घरटी दिसून आली होती. २०२० च्या तुलनेत २०२१ मध्ये शेकरूंच्या संख्येत दीड पटीने वाढ झाल्याचे दिसून आले होते. २०२२ मध्ये मात्र २०२१ च्या तुलनेत त्यांच्या संख्येत घट झाली आहे.

**सूत्र** – *'अकोले : शेकरूंची संख्या घटली',*

*www.esakal.com, २३.०६.२०२२.*

### काटेपूर्णा अभयारण्य

**काटेपूर्णा अभयारण्याजवळ आढळला वाघाचा मृतदेह**

काटेपूर्णा अभयारण्याजवळ अकोला वनपरिक्षेत्रातील सोनखास शिवारात २८ जून रोजी पहाटे एक वाघ मृतावस्थेत आढळला.

काटेपूर्णा अभयारण्यात बिबट्यासह इतर प्राण्यांचा वावर आहे. यापूर्वी या परिसरात वाघ दिसला नव्हता. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात वाघ दिसत असल्याचे ग्रामस्थांनी वनविभागाला कळवले होते.

मात्र, वन विभागाने या परिसरात वाघ येऊ शकत नाही, असा दावा केल्याचे वृत्तात म्हटले आहे. नेमक्या याच परिसरात मृतावस्थेत वाघ आढळून आला आहे. काटेपूर्णा अभयारण्याच्या बाहेर असलेल्या या परिसरात चार बिबट्यांचा वावर असल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**सूत्र** – *'अकोला जिल्ह्यात पट्टेदार वाघाचा मृत्यू',*

*www.esakal.com, २८.०६.२०२२.*

### गौताळा औट्रमघाट अभयारण्य

**गौताळ्यातील तस्कर, शिकाऱ्यांवर कारवाईबाबत गांभीर्याचा अभाव**

जप्त केलेले पाच लाख रुपये किमतीचे चंदन व मौल्यवान खडे वन विभागाच्या गौताळा अभयारण्यातील हिवरखेडा इथल्या कार्यालयातून चोरीला गेले. खेरीज, सिल्लोड इथल्या खवलेमांजर (पँगोलीन) चोरी प्रकरणी आरोपींना लागलीच जामीन मिळाला. महिना-दोन महिन्यांच्या कालावधीत झालेल्या या घटनांमुळे वन विभागाच्या हेतूबाबत स्थानिक लोक व वन्यप्राणीप्रेमींनी साशंकता व्यक्त केली आहे.

सोयगाव इथे खवलेमांजराच्या तस्करांना रंगेहाथ पकडण्यात आले. या प्रकरणी कारवाई प्रलंबित आहे.

तसेच, सिल्लोड भागात खवलेमांजराची चोरी करणारी टोळी वन विभागाने पकडली. मात्र, आरोपींना अटक झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी जामीन मिळाला. त्यापाठोपाठ वन विभागाने जप्त केलेले साडेअकरा किलो चंदन, ३०१ किलो मौल्यवान रंगीबेरंगी खडे, साडेपाच किलो सफेद मुसळी, सात किलो डिंक, ३४२ किलो जळाऊ लाकडाची हिवरखेडा इथल्या कार्यालयातून चोरी झाली. यापूर्वी हिवरखेडा कार्यालयासमोर वन विभागाचे वाहन जाळण्यात आले होते. त्यातील आरोपीही सापडलेले नाहीत. असे असताना जप्त केलेले हे साहित्य हिवरखेड्याऐवजी औरंगाबाद इथल्या वन विभागाच्या कार्यालयात का ठेवले नाही, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

उन्हाळ्यात औरंगाबाद जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रात तयार करण्यात आलेल्या पाणवठ्यात वन विभागाने पाणी भरले नसल्याचे समोर आले आहे. पैठण, कन्नड, सिल्लोड-सोयगाव आदी ठिकाणीही असेच झाले. याकडे वन्यप्राणीप्रेमींनी लक्ष वेधले आहे.

संरक्षणात कुठे वन विभाग कुठे कमी पडला याच्या तपासणासाठी साहाय्यक वनसंरक्षकाच्या अध्यक्षतेखाली विभागीय चौकशी केली जात आहे; तसेच, पोलिसांत तक्रार दाखल केली आहे, असे एका वरिष्ठ वनाधिकाऱ्याने सांगितले.

**सूत्र** – *'औरंगाबाद :चंदनचोर अन् शिकाऱ्यांना वनविभागाचेच अभय!', www.esakal.com, १२.०५.२०२२.*

**बुद्धपौर्णिमेच्या गणनेत गौताळ्यात ३८० प्राण्यांचे दर्शन**

गौताळा औट्रमघाट अभयारण्यात बुद्धपौर्णिमेला (१६ मे) झालेल्या प्राणिगणनेत लांडगा (ग्रे वुल्फ), ससा, रानडुक्कर, नीलगाय, सायाळ (पॉर्क्युपाईन) आदी विविध ३८० पशुपक्ष्यांची नोंद झाली आहे. तीन बिबटेही दिसून आले आहेत.

कन्नड वनपरिक्षेत्रात १३, नागद इथे नऊ, चाळीसगाव इथे सहा पाणवठ्यांवर गणना करण्यात आली. त्यात ६२ स्वयंसेवकांचा सहभाग होता. खेरीज, सात वनपाल, २७ वनरक्षक, २४ वनमजूर यांनी वन्य प्राण्यांच्या प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष नोंदी घेतल्या.

**सूत्र** – *'औरंगाबाद : गौताळ्यात तीन बिबट्यांचे दर्शन', www.esakal.com, १८.०५.२०२२.*

## ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्य

**स्थलांतराचा मागोवा घेण्यासाठी ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यातील सहा पक्ष्यांना अंकन**



फ्लेमिंगो पक्ष्याच्या भारतात प्रजननासाठी योग्य व अयोग्य अशा दोन्ही प्रकारच्या ठिकाणी फ्लेमिंगोच्या स्थलांतराबाबत अभ्यास करण्यासाठी 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS)ने मुंबई महानगर परिसरात उपग्रहाधारित तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अभ्यासाचा प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत सहा फ्लेमिंगोंना सौर उर्जेवर चालणाऱ्या जीपीएस-जीएसएम रेडिओ तंत्रज्ञानावर चालणाऱ्या उपकरणाने अंकन करण्यात आले आहे.

ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यात सप्टेंबर ते मे या कालावधीत सुमारे १,३०,००० फ्लेमिंगो येतात. BNHSने या अभयारण्यातील फ्लेमिंगोंच्या स्थलांतर आणि अधिवास वापराचे प्राधान्यक्रम समजून घेण्यासाठी जानेवारी ते एप्रिल २०२२ या कालावधीत सहा फ्लेमिंगोंना अंकन केले.

या अभ्यासाद्वारे मिळालेली माहिती पक्ष्यांचे स्थलांतर आणि 'सेंट्रल एशियन फ्लायवे' म्हणून

ओळखल्या जाणाऱ्या पक्षी-स्थलांतराच्या मार्गावरील त्यांची स्थिती समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे संस्थेने म्हटले आहे.

अंकन करण्यात आलेल्या फ्लेमिंगोंना नावे देण्यात आली आहेत. भारतात ग्रेटर फ्लेमिंगोचे प्रजनन होते याचा शोध लावणारे कच्छचे राव खेंगरजी तिसरा साहिब बहादूर यांच्या नावावरून 'खेंगरजी तिसरा', एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस कच्छच्या पक्ष्यांवर पुस्तके आणि संशोधन लेख प्रकाशित करणारे ब्रिटिश पक्षीतज्ज्ञ कॅप्टन सी. डी. लेस्टर यांच्या नावावरून 'लेस्टर', निसर्गतज्ज्ञ चार्ल्स मॅकॅन यांच्या नावावरून 'मॅकॅन', कच्छमध्ये लेसर फ्लेमिंगोच्या प्रजननाची पुष्टी करणारे पक्षीशास्त्रज्ञ डॉ. सलीम अली यांच्या नावावरून 'सलीम', पक्षीशास्त्रज्ञांपैकी एक हुमायूं अब्दुलअली यांच्या नावावरून 'हुमायूं', नवी मुंबई प्रदेशाच्या नावावरून 'नवी मुंबई' अशी ही नावे आहेत.

'मुंबई महानगर विभाग विकास प्राधिकरणा'ने या अभ्यासासाठी निधी दिला असून वन विभागाचा कांदळवन कक्ष या प्रकल्पाचे निरीक्षण करत आहे.

**सूत्र** – *'फ्लेमिंगोंना आता 'जीपीएस-जीएसएम रेडिओ टॅग' ;राज्यात पहिल्यांदाच पुढाकार; बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचा प्रकल्प', www.loksatta.com, १४.०५.२०२२.*

## ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यात यंदा फ्लेमिंगोंच्या संख्येत वाढ

मुंबईतील इतर ठिकाणांपेक्षा ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये यंदा फ्लेमिंगोंची संख्या जास्त आढळून आली आहे. 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (BNHS) ने केलेल्या एका सर्वेक्षणानुसार गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये ठाणे खाडीकिनारी २५,००० फ्लेमिंगो दिसून आले होते; ही संख्या यंदा मार्च महिन्यात ५४,००० एवढी होती.

मुंबई महानगर प्रदेशातील फ्लेमिंगो पक्ष्यांची पाहणी BNHSच्या वतीने दरवर्षी केली जाते. या पाहणीत २०१८ पेक्षा यंदा फ्लेमिंगोंची संख्या लक्षणीय वाढल्याचे दिसून येत आहे.

'मुंबई पोर्ट ट्रस्ट'ने १९९४ मध्ये केलेल्या पहिल्या पक्षी गणनेत शिवडी परिसरात ८,००० फ्लेमिंगो आढळून आले होते. ही संख्या दरवर्षी वाढत आहे.

ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यामध्ये डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत ६५,००० फ्लेमिंगोंची गणना झाली असून शिवडी इथे २५,००० तर न्हावा शेवा इथे ९,००० ग्रेटर फ्लेमिंगो आढळून आले आहेत. फ्लेमिंगोच्या दोन प्रजाती भारताच्या खाडीकिनाऱ्यावर दिसून आल्याचे निरीक्षण या पाहणीत नोंदवले आहे.

**सूत्र** – *'फ्लेमिंगोंच्या संख्येत वाढ : काही ठिकाणी वर्षभर वास्तव्य; 'बीएनएचएस'चे सर्वेक्षण', www.loksatta.com, १४.०५.२०२२.*

## <u>ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प</u>

### ताडोबासह कमलापुरातील हत्ती गुजरातला पाठवण्यास केंद्र सरकारची मान्यता

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासह गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर व पातानील इथले एकूण १३ हत्ती गुजरातमधील जामनगर इथे पाठवण्यास केंद्र सरकारने 'ना हरकत' पत्र दिले आहे.

कमलापूर इथल्या आठ हत्तींपैकी चार सुदृढ हत्तींसाठी त्यांच्या संपूर्ण जीवनकाळासाठी सोयीसुविधा, तरतूद 'राधेकृष्ण टेम्पल एलिफंट वेल्फेअर ट्रस्ट'करणार आहे. चार सुदृढ हत्तींबरोबर कमलापूर, पातानील व ताडोबा इथले वयोवृद्ध, अप्रशिक्षित आणि लहान पिल्ले मिळून एकूण १३ हत्ती पाठवण्यात येणार आहेत. या हत्तींना तिथे उभारण्यात येत असलेल्या देशातील सर्वांत मोठ्या प्राणिसंग्रहालयात ठेवणार असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

हत्ती पाठवण्याचा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या कार्यालयाने केंद्र सरकारकडे पाठवल्यापासून हत्ती पाठवण्याला स्थानिक पातळीवरून तसेच वन्यप्राणीप्रेमींकडून विरोध होत आहे. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३, अंक २, क्र. ९; खंड ३, अंक १, क्र. ८*) मंत्री विजय वडेट्टीवार यांनीही विरोध केला होता. माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही हत्ती राज्याच्या बाहेर जाऊ देणार नाही, अशी भूमिका घेतली होती.

**सूत्र** – *'महाराष्ट्रातील १३ हत्ती गुजरातमध्ये जाणार; केंद्राचा हिरवा कंदील', www.esakal.com,११.०५.२०२२.*

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### नवेगाव नागझिऱ्यात ब्रह्मपुरीतून दोन वाघिणींचे आगमन लवकरच अपेक्षित

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी विभागातून दोन वाघिणी आणण्यात येणार आहेत. 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'(WII)चे वैज्ञानिक बिलाल हबीब यांनी जून महिन्याच्या अखेरीस या प्रकल्पाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यामुळे दोन नव्या वाघिणींचे नागझिऱ्यात लवकरच आगमन होण्याची आशा आहे.

मध्य भारतातील व्याघ्र प्रकल्पांना महाराष्ट्रातील व्याघ्र प्रकल्पांशी नवेगाव नागझिरा प्रकल्प जोडतो. नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नवीन नवेगाव वन्यजीव अभयारण्य आणि कोका वन्यजीव अभयारण्य हे क्षेत्र या व्याघ्र प्रकल्पात येते. हे क्षेत्र भ्रमणमार्ग असल्याने इथले वाघ कान्हा, अचानकमार, पेंच, ताडोबा या व्याघ्र प्रकल्पांत जाऊन स्थिरावू लागले. परिणामी, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघ दिसेनासे झाले. या प्रकल्पात निर्माण झालेल्या वाघांच्या व्यस्त प्रमाणाची कारणमीमांसा आणि त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी WIIचे दोन अभ्यासक कार्यरत आहेत.

दुसरीकडे, चंद्रपूर जिल्ह्यात व्याघ्र हल्ल्यांत अनेकांचे बळी जात आहेत. या जिल्ह्यात वाढलेले वाघ आणि त्यातून निर्माण झालेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर या वाघांना कोणत्या क्षेत्रात सोडायचे, यावरही अभ्यास करण्यात आला. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा अभयारण्य (जुने) इथे एकही वाघीण नाही. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी विभागातील दोन वाघिणींना नागझिरा अभयारण्यात सोडण्याच्या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या प्रस्तावावर काम सुरू असताना कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कामाची गती मंदावली होती. मात्र, हबीब यांच्या भेटीमुळे वाघिणींच्या स्थानांतराला गती मिळेल अशी चिन्हे आहेत.

ब्रह्मपुरीतील एकूण चार वाघिणींना या प्रकल्पात सोडण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या टप्प्यात दोन वाघिणींना सोडण्यात येणार आहेत. या वाघिणींवर वन्यजीव विभागाची देखरेख राहणार आहे. या दोन वाघिणी स्थिरावल्यानंतर अन्य दोन वाघिणी प्रकल्पात सोडल्या जाणार आहेत. या वाघिणींमुळे वाघांच्या लिंग गुणोत्तराचे संतुलन साधले जाऊन भविष्यात नागझिरा इथे वाघांच्या संख्येत वाढ होईल अशी अपेक्षा आहे. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३, अंक २, क्र. ९; खंड ३, अंक १, क्र. ८; खंड १, अंक १, क्र. १*)

**सूत्र** - *राजू मस्के. 'स्थलांतरणातून व्याघ्रसंवर्धन, चंद्रपूर जिल्ह्यातून आणणार दोन वाघिणी', maharashtratimes.com, ०४.०७.२०२२.*



**कोका अभयारण्यात बुद्धपौर्णिमेच्या गणनेत ६६६ वन्यप्राण्यांचे दर्शन**

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा भाग असलेल्या कोका अभयारण्यात बुद्धपौर्णिमेला (१६ मे रोजी) झालेल्या प्राणिगणनेत चार वाघ, पाच बिबटे, १७ अस्वले, ५१ गवे, ३२४ रानडुकरे, ११४ चितळ, १३ नीलगायी, १३ जंगली कुत्रे (वाईल्ड डॉग), २२ सांबरे, १८ मोर, दोन साळींदर (पॉर्क्युपाईन), ४९ वानरे (लंगूर) असे ६६६ वन्य प्राणी दिसून आले.

बुद्धपौर्णिमेच्या रात्री अभयारण्यातील पाणवठे व नैसर्गिक तलावांजवळ १७ मचाणे बांधून ही गणना करण्यात आली. अभयारण्यातील १७ वनकर्मचाऱ्यांसह २५ स्वयंसेवकांनी मिळून ही गणना केली. २९ एप्रिल रोजी अभयारण्यात तीन बछड्यांसह एक वाघीण दिसली होती. हे चार वाघही गणनेदरम्यान दिसले.

**सूत्र** – *युवराज गोमासे. 'चार वाघ, पाच बिबट, १७ अस्वलांसह ६६६ वन्यजीवांचे दर्शन', www.lokmat.com, २१.०५.२०२२.*

## नान्नज अभयारण्य

**प्राणिगणनेदरम्यान नान्नज अभयारण्यात माळढोकाचे दर्शन नाही; जुलैमध्ये मात्र मादीचे वनकर्मचाऱ्यांना दर्शन**

नान्नज, गंगेवाडीसह नान्नज माळढोक अभयारण्यातील इतर ठिकाणी यंदा झालेल्या बुद्धपौर्णिमेला (१६ मे रोजी) झालेल्या प्राणिगणनेदरम्यान माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्षी दिसला नाही. गेल्या वर्षी गंगेवाडी इथे माळढोकाची मादी दिसली होती. पुणे विभागाच्या उप वनसंरक्षकांनी ही माहिती दिली.

प्राणिगणनेत ३७४ काळवीट (ब्लॅकबक), चार नीलगायी, २७ मोर, २२० रानडुकरे, ३२ ससे, १३ मुंगूस, ११ लांडगे (ग्रे वुल्फ), आठ खोकड (इंडिअन फॉक्स), तीन साळींदर (पॉर्क्युपाईन), एक कोल्हा (गोल्डन जॅकल), तीन घोरपडी (मॉनिटर लिझर्ड) आदी प्राणी दिसले. अभयारण्यातील १८ ठिकाणी पाणवठ्यांजवळ मचाणे, लपण उभारून ही गणना करण्यात आली. वनकर्मचारी व स्वयंसेवक अशा ३० जणांनी ही गणना केली.

नान्नज अभयारण्यात दिसलेल्या माळढोकाची वर्षनिहाय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दिसलेले माळढोक |
|---|---|
| २००२ | २१ |
| २००३ | १३ |
| २००४ | १५ |
| २००५ | २२ |
| २००६ | ९ |
| २००७ | २४ |
| २००८ | ३० |
| २००९ | २४ |
| २०१० | २१ |
| २०११ | ९ |
| २०१२ | १३ |
| २०१३ | १० |
| २०१४ | ३ |
| २०१५ | २ |
| २०१६ | ६ |
| २०१७ | १ |
| २०१८ | १ |
| २०१९ | १ |
| २०२० | १ |
| २०२१ | १ |
| २०२२ | ० |

दरम्यान, २२ जुलै रोजी अभयारण्यात माळढोकाची मादी रस्ता ओलांडत असताना वनकर्मचाऱ्यांना दिसली व त्यांनी तिचे चित्रीकरण केल्याचे वृत्त आहे.

**सूत्र** – *अरूण बारसकर. 'मोठी बातमी; चार वर्षांत कुठेतरी दिसणारा माळढोक यंदा राज्यात कुठे दिसलाच नाही',www.lokmat.com, २६.०५.२०२२.*
*'वन्यजीव गणनेत माळढोक दिसलाच नाही; ३७४ काळवीट, चार नीलगायी दिसल्या', www.lokmat.com, १८.०५.२०२२.*
*विनोद कामतकर. 'वन्यजीव प्रेमींच्या उत्साह:नान्नज अभयारण्यात परतला माळढोक पक्षी, विभागापुढे संरक्षण अन् संवर्धनाचे मोठे आव्हान', divyamarathi.bhaskar.com, २६.०७.२०२२.*

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### गळ्यातील सापळ्यातून सुटका झालेली पेंच व्याघ्र प्रकल्पातील वाघीण सुखरूप

पेंच व्याघ्र प्रकल्पातील 'टी-४१' या वाघिणीच्या गळ्यात अडकलेल्या सापळ्यामुळे वाघिणीला झालेल्या जखमा बऱ्या झाल्याची खातरजमा करण्यात वन विभागाला यश आले आहे.

स्वयंचलित कॅमेरा छायाचित्रांच्या नियमित तपासणीदरम्यान २६ जानेवारीला अंदाजे पाच वर्षांच्या 'टी-४१' या वाघिणीच्या गळ्यात सापळा अडकल्याचे दिसून आले होते. पेंच व्याघ्र प्रकल्पातील नागलवाडी वनक्षेत्रातील 'माय के पार' नियतक्षेत्रातील जंगलात ही वाघीण आढळली. लगतच्या गावाच्या भागापासून हे अंतर अंदाजे एक किलोमीटर आहे. त्यानंतर वाघिणीवर लक्ष ठेवण्यासाठी सुमारे ६० स्वयंचलित कॅमेरे लावण्यात आले होते. त्यात नियमित वन कर्मचारी, विशेष व्याघ्र संरक्षण दल आणि संरक्षण कामगार यांचा समावेश असलेली ११ पथके तैनात करण्यात आली होती. गावकऱ्यांना सावधानतेचा संदेश देण्यासाठी पर्यावरण विकास समितीचे सदस्य, पोलीस पाटील आणि लगतच्या गावांचे सरपंच यांचा व्हॉट्सअप गट तयार करण्यात आला.

२०२१ च्या चौथ्या टप्प्यातील निरीक्षण अहवालानुसार, वाघिणीचा वावर पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या नागलवाडी, सालेघाट आणि पश्चिम पेंच पर्वतरांगांमध्ये होता. ज्यात अंदाजे ४० कक्ष आणि ११० चौरस किमीपेक्षा जास्त क्षेत्र होते. सातत्याने ती लांबचे अंतर पार करत होती. इथे एक नर वाघ 'टी-४१' सोबत फिरत असल्याचेही आढळून आले. १७ फेब्रुवारीला छायाचित्रांतून वाघिणीची सापळ्यातून सुटका झाल्याचे दिसून आले. मात्र, वाघिणीच्या मानेवर जखमा असल्याने पथक तिच्यावर लक्ष ठेवून होते. १६ एप्रिलच्या छायाचित्रात तिच्या मानेवरील जखमा बऱ्या झाल्याचे दिसून आले.

**सूत्र** – *'वाघिणीच्या गळ्यातून सापळा निघाला, वाघीण सुखरूप', www.loksatta.com, २५.०५.२०२२.*

### रंगद्रव्यातील बदलामुळे वेगळी दिसणारी हरणे पेंच व्याघ्र प्रकल्पात; वनाधिकाऱ्याचा शोधनिबंध



पेंच व्याघ्र प्रकल्पात नियमित गस्तीदरम्यान पांढऱ्या रंगाचे सांबर, मानेच्या भागावर अर्धवट पांढरा रंग असलेले चितळ आणि नेहमीपेक्षा अधिक काळसर रंगाचे चितळ दिसून आले. त्या अनुषंगाने प्रकल्पाचे साहाय्यक वनसंरक्षक अतुल देवकर यांचा प्राण्यांमधील रंगद्रव्यांविषयीचा शोधनिबंध 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ

ॲडव्हान्स रिसर्च' या संशोधनपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

मेलॅनिन हे सस्तन प्राण्यांमध्ये आढळणारे मुख्य रंगद्रव्य आहे. मेलॅनिनचे युमेलॅनिन आणि फेओमेलॅनिन हे प्रकार आहेत. ते काळया ते पिवळसर आणि पिवळसर ते लाल रंगांच्या रंगश्रेणी तयार करतात. मेलॅनिनचा विकास हा मेलॅनिन संश्लेषण नावाच्या जैवरासायनिक प्रक्रियेवर अवलंबून असतो, तो कोणत्याही त्रासामुळे किंवा अनुवंशिक उत्परिवर्तनाने प्रभावित होतो. साधारणपणे रंगातील बदल आसपासच्या हंगामी हवामान परिस्थितीवर आणि प्राणी जिथे आढळतात, त्या भौगोलिक प्रदेशावर अवलंबून असतात. या शिवाय वय, लिंग, आरोग्य आणि पोषण हे प्राण्यांच्या दिसण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, असे शोधनिबंधात म्हटले आहे.

**सूत्र** – *'पेंच व्याघ्र प्रकल्पात पांढऱ्या रंगाचे सांबर हरीण, अर्धे पांढरे व अर्धे नियमित रंगाचे चितळ हरीण व नेहमीपेक्षा अधिक काळसर रंगाचे चितळ', www.loksatta.com, २५.०५.२०२२.*

## भीमाशंकर अभयारण्य

### भीमाशंकर अभयारण्यात प्राणिगणनेदरम्यान बिबट्याचे दर्शन नाही; सांबरे व भेकरे मुबलक

भीमाशंकर अभयारण्यात बुद्धपौर्णिमेला (१६ मे रोजी) झालेल्या प्राणिगणनेत प्रामुख्याने सांबर व भेकर दिसून आले; बिबटे मात्र दिसले नाहीत. भीमाशंकर अभयारण्य शेकरू (जाएंट स्क्विरल) साठी प्रसिद्ध आहे. मात्र, शेकरूची गणना स्वतंत्रपणे केली जाते.

बुद्धपौर्णिमेला २० वनकर्मचारी व २५ स्वयंसेवकांनी मिळून पाणवठ्यांजवळ प्राणिगणना केली. भीमाशंकरच्या जंगलातील चौरा, वीरतले, भाकादेवी, वाजेवाडी, घाटघर, उघडी कलमजाई, करवीचा दरा आदी ठिकाणी मचाणे उभारून ही गणना करण्यात आली. त्यामध्ये १३ सांबरे, ७ भेकरे (रेड मंटजॅक), वानरे (लंगूर), मोर, ससे, रानकोंबडे, उदमांजर (ऑटर), खवलेमांजर (पँगोलीन), शेकरू आदी प्राणी दिसून आले.

अभयारण्यापेक्षा ऊसाच्या शेती, बागायतीत लपण, खाद्य मिळणे तुलनेने सोपे असल्याकारणाने बिबटे जंगलाऐवजी तिकडे वळले असावेत, अशी शक्यता वृत्तात नमूद केली आहे.

**सूत्र** - *'भीमाशंकर अभयारण्यातून बिबट्या बेपत्ता, जंगल सोडून ऊस शेतीकडे; सांबरांची संख्या वाढली', www.lokmat.com, १८.०५.२०२२.*

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### अकोला ते खंडवा रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण मेळघाट गाभा क्षेत्राबाहेरील पर्यायी मार्गाने

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातून अकोला ते खंडवा रेल्वेमार्गाचे प्रस्तावित विस्तारीकरण आता संरक्षित क्षेत्राबाहेरून होणार आहे.

पर्यायी भागातून विस्तारीकरण केल्याने वाघांचा अधिवास सुरक्षित राहील. तसेच, जळगाव, जामोद आणि संग्रामपूर या तालुक्यांसह आजूबाजूच्या १०० गावांना नव्या विस्तारीत मार्गाचा लाभ होईल, असे वृत्तात नमूद केले आहे.

रेल्वे मंत्रालयाने अकोला ते खंडवा अशा १७६ किमी रेल्वेमार्गाला 'मीटरगेज'मधून 'ब्रॉडगेज'मध्ये रुपांतरीत करण्याचा प्रस्ताव काही वर्षांपूर्वी मांडला होता. हे विस्तारीकरण व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातून प्रस्तावित होते. वाघांच्या अधिवासाला धोका पोहोचू नये म्हणून हे विस्तारीकरण पर्यायी मार्गाने व्हावे, अशी मागणी होती. मुळातच या गाभा क्षेत्राच्या संरक्षण व संवर्धनासाठी इथली १६ गावे व गाभ्याबाहेरील सहा गावांचे इतरत्र पुनर्वसन करण्यात आले आहे. ही गावे या रेल्वेमार्गाच्या दहा किमी परिघातील होती.

'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) ने सुद्धा या रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण पर्यायी भागातून

करण्याची सूचना केली होती.

गाभा क्षेत्रातून विस्तारीकरणाला विरोध होत असताना 'केंद्रीय व्याघ्रसंवर्धन प्राधिकरण' (NTCA) ने २०१५ मध्ये त्रिसदस्यीय समिती नेमली. या समितीने दोन पर्यायी मार्ग वन्यजीव उपाययोजनांसह डिसेंबर २०१७ मध्ये केंद्र शासनाला कळवले. त्यानंतर मात्र हा प्रकल्प रखडला होता. अखेर यंदा ११ जून रोजी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली 'वेस्टर्न झोन काउन्सिल'ची २५ वी बैठक पार पडली. त्यात अकोला ते खंडवा रेल्वेमार्गाचे विस्तारीकरण मेळघाटमधील जुन्या मार्गाऐवजी हिवरखेड (रूपराव) सोनाळा, जामोद, उसरणी, खकनार या नवीन पर्यायी मार्गावर केले जाईल, असा निर्णय घेण्यात आला.

पूर्णा ते खंडवा हा 'मीटरगेज' रेल्वेमार्ग १९६० च्या दशकात सुरू झाला. राजस्थानमधील जयपूर ते तेलंगणातील काचिगुडा असा हा रेल्वेमार्ग असून तो राजस्थानातील जयपूर, अजमेर, चित्तोडगढ, मध्यप्रदेशातील रतलाम, इंदूर, महू आणि खंडवा, महाराष्ट्रातील अकोला, पूर्णा, नांदेड, मुदखेड आणि तेलंगणातील निझामाबाद आणि सिकंदराबाद या शहरांना जोडतो. या मार्गावर मेळघाटातून जाताना रेल्वेगाडी धीम्या गतीने जात असल्यामुळे तिचा गैरवापरच अधिक होत असे. मेळघाटमधील मुसळी, अश्वागंधासारख्या वनौषधी, हरणाची शिंगे, लाकडाच्या मोळ्या आणि वाघांच्या शिकारीनंतर त्यांच्या अवयवांच्या तस्करीसाठी अत्यंत सोयीचे वाहन अशी या रेल्वेची ओळख बनली होती. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड२, अंक ४, क्र.* ७)


**सूत्र** – *'अकोला-खंडवा रेल्वे विस्तारीकरण आता वन्यजीव क्षेत्राबाहेरून; केंद्रीय गृहमंत्र्यांच्या बैठकीत शिक्कामोर्तब', www.loksatta.com, १५.०६.२०२२.*

### मेळघाटातील हरणांची शिकार करणाऱ्या सात जणांवर कारवाई

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सिपना वन्यजीव विभागात रायपूर वनपरिक्षेत्रातील बोडपडात मंडळात ८ जून पाच चौशिंगे (फोर-हॉर्न्ड अँटीलोप) आणि दोन भेकरे (रेड मंटजॅक) मृतावस्थेत आढळली. पाणवठ्यात विष मिसळून त्यांना मारण्यात आल्याचे चौकशीत समोर आले. वन विभागाने या प्रकरणी सात शिकाऱ्यांना अटक केली.

या शिकाऱ्यांनी गावाच्या शेतीजवळ बोरीपाटी नदीच्या पात्रातील असलेल्या पाणवठ्यात युरिया कालवून वन्य प्राण्यांची शिकार केली. विषप्रयोग करून शिकार केल्यानंतर शिकाऱ्यांसह अन्य काही लोकांनी या प्राण्यांचे मांस खाल्ले. कारवाई करण्यासाठी गेलेल्या वन विभागाच्या पथकावर लोकांनी हल्लाही केला.

वन विभागाने शिकाऱ्यांच्या घरांमधून वन्य प्राण्यांचे अवयव व काही शस्त्रे जप्त केली. आरोपींवर वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तात्पुरत्या वनकोठडीनंतर न्यायालयीन कोठडीअंतर्गत आरोपींची रवानगी कारागृहात करण्यात आली.



**सूत्र** – *'चौशिंगा, भेकरांना विष देऊन मारले', www.esakal.com, १७.०६.२०२२.*

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या प्रतीक्षेत सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

राज्यातील इतर व्याघ्र प्रकल्पांप्रमाणे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातही विशेष व्याघ्र संरक्षण दलाची नेमणूक करावी,

अशी मागणी गेल्या साताठ वर्षांपासून केली जात आहे. याबाबत केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांना पुन्हा एकदा पत्र देण्यात आले असून त्यांनी त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

अलीकडच्या काही वर्षांत सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात शिकारी, वृक्षतोडीच्या घटना वाढल्या आहेत. वन्य प्राण्यांच्या हालचाली टिपण्यासाठी लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यांची चोरी, औषधी वनस्पतींची तस्करी, वणवे लावणे अशा घटना समोर आल्या आहेत.

प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी राज्य व केंद्र शासनाकडे याबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केला. २०१४ मध्ये साताऱ्याचे मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या लक्षात आणून दिली होती. चव्हाण यांनी तेव्हा तत्कालीन केंद्रीय पर्यावरण मंत्री विरप्पा मोईली यांना पत्र लिहून याकडे त्यांचे लक्ष वेधले. या मुद्द्यावर कार्यवाही करत केंद्राने मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर केले, पण सह्याद्री व्याघ्र प्रकल्प दुर्लक्षितच राहिला.

त्यानंतर याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यानंतरचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही पत्र लिहिण्यात आले होते. आता केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांचे याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. त्यांनी भाटे यांचे पत्र विशेष अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

२००९ साली केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना काढल्या होत्या. त्यामध्ये १३ व्याघ्र प्रकल्पांमध्ये 'विशेष व्याघ्र संरक्षण दल' निर्माण करण्याची परवानगी दिली होती व वन विभागाने त्यांच्या पातळीवरच या दलांची निर्मिती करावी, असे स्पष्ट निर्देश दिले होते. राज्यातील ताडोबा अंधारी, पेंच या व्याघ्र प्रकल्पांना २०११-२०१२ मध्ये व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला २०१४ मध्ये विशेष व्याघ्र संरक्षण दल देण्यात आले.

**सूत्र** – *'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात विशेष व्याघ्र संरक्षण दलाची गरज', www.loksatta.com, २३.०४.२०२२.*

## चांदोली व कोयना संरक्षित क्षेत्रांतील वनपरिक्षेत्रांत ११६ गव्यांची नोंद



सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील चांदोली व कोयना संरक्षित क्षेत्रांतील वन्य प्राण्यांची बुध्दपौर्णिमेला (१६ मे रोजी) गणना करण्यात आली. या गणनेत हेळवाक, ढेबेवाडी, कोयना, बामणोली या वनपरिक्षेत्रांत ११६ गवे आढळून आले. या चारही क्षेत्रांत १५ प्रजातींच्या २२४ वन्य प्राण्यांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.

कोविड-१९ साथीच्या दोन वर्षांच्या कालखंडानंतर यंदा वन विभागाने बुध्दपौर्णिमेच्या रात्री वन्यप्राण्यांची गणना केली.

गणनेसाठी वनकर्मचाऱ्यांच्या सोबतीला वन्यप्रेमी स्वयंसेवकांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्यात आली. नोंदणी केलेल्या स्वयंसेवकांना गणनेसाठी आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांच्यासाठी नियमावलीही तयार करण्यात आली. गणना करण्यासाठी वनपरिक्षेत्रातील पाणवठ्यांच्या परिसरात मचाणे उभारून त्यावर वनकर्मचारी व स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली.

या गणनेदरम्यान आढळलेले काही वन्य प्राणी पुढीलप्रमाणे – चांदोली वनपरिक्षेत्रात ८४ वन्य प्राणी; व्याघ्र प्रकल्पातील ११६ पैकी सर्वाधिक ४५ गवे कोयना क्षेत्रातत्यानंतर हेळवाक क्षेत्रात ४०, ढेबेवाडी १३,

बामणोली इथे १८ गवे दिसून आले.

**सूत्र** – *'सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात ११६ गवे', www.esakal.com, २१.०५.२०२२.*

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानासाठी गुजरात वन खात्याकडे सिंहांची मागणी

मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सिंहांची संख्या वाढवण्यासाठी राज्याच्या वन विभागाने गुजरातमधून सिंह आणण्याबाबत प्रस्ताव तयार केला आहे. वन्यप्राणी आदानप्रदान योजनेअंतर्गत सिंहांच्या एका जोडीच्या मोबदल्यात वाघाची एक जोडी देण्याचे प्रस्तावात नमूद केले आहे. सिंहांची आणखी एक जोडी मिळाल्यास बिबटे देण्यात येतील, असे वृत्तात नमूद केले आहे. उद्यानाचे संचालक व वनसंरक्षक जी. मल्लिकार्जुन, अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (पश्चिम वन्यजीव विभाग) डॉ. क्लेमेंट बेन यांनी एप्रिल महिन्याच्या पूर्वार्धात यासाठी गुजरातमधील संबंधितांची भेट घेतली.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील सिंहांची संख्या वाढवण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून उद्यान प्रशासन प्रयत्नशील आहे. गुजरातमधील जुनागढ इथल्या सक्करबाग प्राणिसंग्रहालयाशी यापूर्वी बोलणी झाली होती. मात्र, त्यातून काही निष्पन्न झाले नाही. ओदिशा आणि तेलंगणातूनही सिंह मिळवण्याचा प्रयत्न महाराष्ट्राने केला, पण त्यालाही यश आले नाही. २०२१च्या सुरुवातीला पुन्हा गुजरातशी वन्य प्राणी आदानप्रदान योजनेअंतर्गत बोलणी करण्यात आली. मात्र, अजून त्यावर शिक्कामोर्तब झालेले नाही.

महाराष्ट्राप्रमाणेच या आधी मध्य प्रदेशने देखील गुजरातकडे सिंहांची मागणी केली होती. गुजरातने होकार दिल्यानंतर 'केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण' (CZA)ने ही मंजुरी दिली. मात्र, ऐनवेळी गुजरात वन खात्याच्या अधिकाऱ्यांनी हा निर्णय गुजरातचे मुख्यमंत्री घेतील, असे सांगून सिंह देणे टाळले. महाराष्ट्रासोबतची बोलणी पूर्ण झाली नसली तरीही मध्य प्रदेशप्रमाणे महाराष्ट्रालाही असाच अनुभव येण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे वृत्तात म्हटले आहे.

**सूत्र** – *'राज्यातील सिंहवाढीसाठी गुजरातला साकडे; संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकरता वनखात्याच्या हालचाली; प्रस्ताव सादर', www.loksatta.com, ०४.०५.२०२२.*

## राज्यस्तरीय बातम्या

### 'राज्य वन्यजीव कृती आराखड्या'च्या अंमलबजावणीसाठी संनियंत्रण समिती

राज्यातील वन्यजीवांच्या परिणामकारक व कालबद्ध संवर्धनासाठी कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याकरता 'राष्ट्रीय वन्यजीव कृती आराखड्या'च्या धर्तीवर २०२१ ते २०३० या १० वर्षांच्या कालावधीसाठी 'राज्य वन्यजीव कृती आराखडा' तयार करण्यात आला आहे. या आराखड्याला महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या १७ व्या बैठकीत मान्यता मिळाली. आता या आराखड्याच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय संनियंत्रण समिती नेमण्यात आली आहे.

या समितीत सदस्य सचिव म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), सदस्य म्हणून गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव, वित्त विभागाचे प्रधान सचिव, नियोजन विभागाचे प्रधान सचिव, ग्रामविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, वन खात्याचे प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रधान सचिव, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव, आदिवासी विकास विभागाचे सचिव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबलप्रमुख) तसेच राज्य वन्यजीव मंडळातील दोन अशासकीय सदस्य

यांचा समावेश आहे. या अशासकीय सदस्यांचा कालावधी दोन वर्षांचा राहील. समितीची दर सहा महिन्यांनी बैठक आयोजित करण्यात येईल.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वन्यजीव कृती आराखडा संनियंत्रण कक्षदेखील स्थापन करण्यात आला आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) हे या कक्षाचे सहाध्यक्ष आहेत. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर, पश्चिम मुंबई, कांदळवन कक्ष, वनसंरक्षक (वन्यजीव) व विभागीय वनाधिकारी (वन्यजीव), प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) यांचे कार्यालय यांचा या कक्षात समावेश करण्यात आला आहे. तसेच वनबलप्रमुख आवश्यकतेनुसार अधिकारी, कर्मचारी आणि तज्ज्ञांचा सनियंत्रण कक्षात समावेश करू शकतील.

राज्य वन्यजीव कृती आराखडा १२ प्रकरणांत विभागला आहे. दुर्मीळ प्रजातींचे संवर्धन, शिकार आणि वन्यजीवांच्या अवैध व्यापारावर नियंत्रण, माणूस-वन्यजीव संघर्षावर उपाययोजना व बचाव कार्य, वन्यजीवांचे आरोग्य व्यवस्थापन, प्रादेशिक भूभागावरील जल परिसंस्थेची संवर्धन प्रणाली, किनारी व सागरी परिसंस्थांचे संवर्धन, वन्यजीव क्षेत्रातील पर्यटन व्यवस्थापन, संवर्धनाची जाणीव जागरूकता, लोकसहभाग, संशोधन आणि संनियंत्रण बळकट करणे, वन्यजीव क्षेत्राकरता शाश्वत निधी सुनिश्चित करणे, राज्यात संरक्षित क्षेत्राचे जाळे बळकट करणे आणि वाढवणे या विषयांचा आराखड्यात समावेश आहे.

**सूत्र** – *'राज्य वन्यजीव कृती आराखडा अंमलबजावणीसाठी संनियंत्रण समिती', www.loksatta.com, २५.०५.२०२२.*

## राज्याकडून 'धोकाग्रस्त वन्यजीव अधिवासां'ची घोषणा; केंद्र सरकारची अंतिम मंजुरी आवश्यक

राज्यात सुमारे १० 'धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास' (CWH – Critical Wildlife Habitat) घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये मयुरेश्वर-सुपे, बोर, नवीन बोर, विस्तारित बोर, नरनाळा, लोणार वन्यजीव अभयारण्य, गुगामल राष्ट्रीय उद्यान, देऊळगाव-रेहेकुरी काळवीट अभयारण्य, मराठवाड्यातील येडशी रामलिंगघाट व नायगाव मयूर या अभयारण्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाच्या ६ जून रोजी झालेल्या १८ व्या बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

वन हक्क कायदा २००६ (FRA) तील 'कलम दोन-ब'नुसार नुसार अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानातील क्षेत्रात वन्यजीव संवर्धनासाठी CWH घोषित करणे अपेक्षित होते. गेली १६ वर्षे हा विषय प्रलंबित होता.

राज्य वन्यजीव मंडळाच्या १५ व्या बैठकीदरम्यान CWH चे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी हे प्रस्ताव मंडळाची उपसमिती तयार करून तिच्याकडे परीक्षणासाठी पाठवण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला होता. राज्यात ४९ अभयारण्ये आणि सहा राष्ट्रीय उद्याने अशी एकूण ५५ संरक्षित क्षेत्र आहेत. या सर्व संरक्षित क्षेत्रांकरता CWHचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून प्रस्तावांच्या परीक्षणासाठी महसूल विभागनिहाय चार उपसमित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २, अंक १, क्र. ४*)


दरम्यान, CWH क्षेत्र जाहीर करण्याचा अधिकार वन हक्क कायद्यान्वये केंद्र सरकारला आहे. राज्य सरकारला CWH क्षेत्राची शिफारस केंद्राकडे करावी लागते. केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीनंतरच CWH अधिसूचित केले जाते.

**सूत्र** – *'धोकाग्रस्त वन्यजीव क्षेत्र मंजुरीचे अधिकार केंद्राला', www.esakal.com,०७.०६.२०२२.*
*राखी चव्हाण. 'धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास घोषित होणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य', www.loksatta.com, ०६.०६.२०२२.*
*'येडशी रामलिंगघाट, नायगाव धोकाग्रस्त*

*वन्यजीव अधिवास',*

*maharashtratimes.com, ०७.०६.२०२२.*

**राज्यात १२ नवीन संवर्धन राखीव क्षेत्रे आणि तीन नवीन अभयारण्ये**



महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाची १८ वी बैठक ६ जून रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत घेण्यात आली. या बैठकीत राज्यात ६९२.७४ चौरस किमी क्षेत्रफळावरील वनांना नवीन १२ संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जळगाव जिल्ह्यातील वाघांचा अधिवास असलेल्या मुक्ताईनगर तालुक्यातील मुक्ताई-भवानी वनक्षेत्राला वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. गडचिरोलीतील 'कोलामार्का'ला अभयारण्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. रानम्हशीं-(वाईल्ड बफेलो)च्या संवर्धनासाठी हे अभयारण्य करण्यात आले असून सध्या या भागात ४३ रानम्हशी असल्याचे वन विभागाने सांगितले. तिसरे अभयारण्य विस्तारित लोणार क्षेत्र आहे.

नाशिक जिल्ह्यात चार तालुक्यांमध्ये संवर्धन राखीव क्षेत्र करण्याचा निर्णय झाला आहे. कळवणमध्ये ८४.१२ चौरस किमी क्षेत्रातील ३० गावे, त्र्यंबकेश्वरात ९६.९७ चौरस किमी क्षेत्रातील ३३ गावे आणि इगतपुरीत ८८.४९ चौरस किमी क्षेत्रातील २८ गावांचा समावेश असेल. मोरागड (बागलाण) इथे ४२.८७ चौरस किमी क्षेत्राला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यातील चिवटीबावरी हे ६६.०४ चौरस किमी, अलालदरी १००.५६ चौरस किमी, रायगड जिल्ह्यातील रायगड ४७.६२ चौरस किमी, रोहा २७.३० चौरस किमी, पुणे जिल्ह्यातील भोर २८.४४ चौरस किमी, कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठार ५.३४ चौरस किमी, नागपूर जिल्ह्यातील मोगरकसा १०३.९२ चौरस किमी यांना राखीब संवर्धन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. सातारा शहराजवळच्या दरे (खुर्द) महादरे १.०७ चौरस किमी क्षेत्राला'फुलपाखरू संवर्धन राखीव क्षेत्र' म्हणून मान्यता मिळाली आहे.

महादरे खोऱ्यातील जैवविविधतेचा अभ्यास व संशोधन 'महादरे इकॉलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट' (मेरी) ही संस्था २०१७ पासून करत आहे. खोऱ्यातील जवळपास १.०५ चौरस किमी परिसरात एकूण ४६७ प्रकारच्या वनस्पती प्रजाती आढळून आल्या आहेत. यातील बऱ्याचशा प्रदेशानिष्ठ व दुर्मीळ वनस्पती आहेत. सुमारे ४७ रानभाज्यांची नोंद या परिसरात करण्यात आली आहे. सस्तन वन्य प्राण्यांच्या २० प्रजाती, पक्ष्यांच्या ११८ प्रजाती, सरीसृप व उभयचरांच्या १६ प्रजाती, माशांच्या २२ प्रजाती, सहस्रपाद प्राण्यांच्या तीन प्रजाती, पतंगाच्या ८० प्रजाती, कोळ्यांच्या ११० प्रजाती आणि फुलपाखरांच्या एकूण पश्चिम घाटात आढळणाऱ्या ३४१ प्रजातींपैकी १७८ प्रजाती इथे आढळून आल्या आहेत.

**सूत्र** - *'नाशिकमध्ये चार नवे राखीव संवर्धन क्षेत्र',*

*maharashtratimes.com, ०७.०६.२०२२.*

*'राज्यात होणार तीन नवी अभयारण्ये, राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत निर्णय',*

*www.loksmat.com, ०७.०६.२०२२.*


*विश्वास पवार. 'राज्यात फुलपाखरांसाठी राखीव क्षेत्र; साताऱ्यातील दरे खुर्द महादरेला मान्यता; संशोधन-अभ्यासासाठी अधिक वाव',*

*www.loksatta.com,०८.०६.२०२२.*

*कोमल आचरेकर. 'हत्ती कॅम्प नंतर दुर्मिळ रानम्हशी ठरणार गडचिरोलीचे वनवैभव',*

*maharashtratimes.com, १०.०६.२०२२.*

## वनाधिकाऱ्यांच्या बदल्या व पदोन्नती रखडल्याने वन विभागाच्या कामकाजावर दुष्परिणाम



वन विभागातील वनपरिक्षेत्र अधिकारी (RFO) आणि साहाय्यक वनसंरक्षक (ACF) या दोन्ही पदांची पदोन्नती रखडल्याचे वृत्त आहे. त्यामागे अधिकाऱ्यांच्या कामाचा भाग असलेली न्यायप्रक्रिया व त्यातील रेंगाळलेले खटले ही प्रमुख कारणे असल्याचे आढळले आहे.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार अद्याप कोणत्याही बदल्यांचे आदेश देण्यात आलेले नाहीत. परिणामी, महाराष्ट्र वन विभागातील 'अ' आणि 'ब' वर्गातील अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी कायम आहे.

राज्यात विभागीय वनाधिकाऱ्यांची जवळपास ५५ पदे रिक्त आहेत. त्याचा कामकाजावर परिणाम होत असून, अतिरिक्त कार्यभारामुळे एका पदाला न्याय देणे शक्य होत नाही. नाशिक वनवृत्तातही अशीच स्थिती आहे. नाशिक पश्चिम आणि पूर्व या महत्त्वाच्या कार्यालयांच्या साहाय्यक वनसंरक्षकांकडे मुख्यालयातील इतर विभागांचीही जबाबदारी आहे. वन्यजीव आणि रोहयो विभागाच्या साहाय्यक वनसंरक्षकांकडे पश्चिमच्या तीन विभागांची अतिरिक्त जबाबदारी आहे. त्यामुळे एकाच अधिकाऱ्याला स्वत:च्या मुख्य कार्यभारासह इतर दोन किंवा तीन कार्यालयांची जबाबदारी सांभाळावी लागत आहे. नाशिक वनवृत्तातील किमान दहा वनपाल वनपरिक्षेत्र अधिकारी पदाच्या बढतीच्या प्रतीक्षेत आहेत, तर वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना साहाय्यक वनसंरक्षक म्हणून पदोन्नती मिळणे अपेक्षित आहे. ठाणे, नागपूर, पुणे या वनवृत्तांतही अशीच स्थिती आहे. बढत्यांसाठी गेल्या वर्षी पदोन्नती समितीची बैठक झाली. अंतिम सेवाज्येष्ठता यादी तयार झाली पण निर्णय झालेला नाही.

**सूत्र** – *'वन विभागातील पदोन्नतीचं काही ठरेना, अधिकारी प्रतीक्षेत, बदल्यांचाही झालाय खोळंबा', maharashtratimes.com, ११.०६.२०२२.*

## समृद्धी महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी केलेल्या उपाययोजनांच्या परिणामकारकतेबाबत प्रश्नचिन्ह

समृद्धी महामार्गावरील नारंगवाडी टोल नाका परिसरात हरणांचा वावर दिसून आला आहे. यामुळे समृद्धी महामार्गातील प्राण्यांसाठी केलेल्या उपाययोजनेतील त्रुटी पुन्हा एकदा उघड झाल्या आहेत.

महामार्गावर शर्यत लावल्यासारखी हरणे धावत असल्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाली. 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा'ने 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII) च्या सूचनांनुसार ७०० किमीपैकी सुमारे ११५ किमी अंतरात वन्य प्राण्यांसाठी उपाययोजना करून घेतल्या. तरीदेखील, नारंगवाडी टोल नाका परिसरातून हरणे महामार्गावर चढली आणि पुलगाव टोल नाक्यापर्यंत धावत गेली. त्यामुळे उपाययोजनेअंतर्गत वन्य प्राण्यांसाठी केलेल्या मार्गाचा वापर करण्याऐवजी हरणे थेट महामार्गावर आल्यामुळे उपाययोजनांच्या उपयुक्ततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सूत्र** - *'समृध्दी महामार्गावर दिसून आली हरणांची शर्यत; उपाययोजनांमधील त्रूटी पुन्हा एकदा उघड!', www.loksatta.com, २०.०६.२०२२.*

## पश्चिम महाराष्ट्र

## मसाई पठाराला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्याच्या निर्णयाबाबत संमिश्र प्रतिक्रिया

कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठार हे संवर्धन राखीव क्षेत्र करण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाचे पर्यावरणप्रेमी,

पर्यावरण अभ्यासकांनी स्वागत केले आहे, तर त्या परिसरातील ग्रामीण भागातील लोकांचा निर्णयाला विरोध आहे.

मसाई पठार विस्तीर्ण असल्याने काही व्यावसायिक गणिते होती. इथे पवनचक्कीद्वारा वीजनिर्मितीचा बेत होता. त्यासाठी वारामापक यंत्र बसवले होते. या पठारावर एके काळी विमानतळ उभारण्याची घोषणा तत्कालीन आमदारांनी केली होती. अलीकडे मसाई पठाराचा विकास होऊन पर्यटन केंद्र व्हावे म्हणून काही हौशी तरुणांनी पंचवार्षिक आराखडा केला आहे. त्यामध्ये रस्ता, वृक्ष लागवड, प्रेक्षणीय स्थळे केंद्रे तयार करणे, ईश्वर महादू तलावातील गाळ काढून तो खुला करणे, विश्रांतीगृह उभारणी आदींचा समावेश आहे. खेरीज, मसाई पठारालगतची बौद्ध लेणी – पांडवदरा गुहा यामुळे पठाराला धार्मिक महत्व आहे. बौद्ध लेण्यांचे केंद्रीय पुरातत्त्व विभागाने संवर्धन करून त्याचे पर्यटनस्थळात रूपांतर करावे, अशी मागणी कोल्हापूर जिल्हा बौद्ध अवशेष व विचार संवर्धन समितीच्या वतीने करण्यात आली आहे. समितीच्या वतीने दरवर्षी इथे गौतम बुद्धांची जयंती साजरी केली जाते. मसाई पठार हे संरक्षित राखीव क्षेत्र केल्याने नियम लागू होतील म्हणून समितीसह स्थानिकांनी शासनाच्या निर्णयाला विरोध दर्शवला आहे.

कस्तुरीरंगन समितीच्या अहवालाप्रमाणे शाहूवाडी तालुक्यातील ५१ गावे प्रस्तावित संरक्षित क्षेत्रात समाविष्ट केली जाणार आहेत. या गावांना त्यातून वगळण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेच्या माजी आमदाराने गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली होती. या गावांमध्ये बॉक्साईट खाणी मंजूर आहेत. त्यातून रोजगार, वाहतूक, हॉटेल व्यवसायातून उत्पन्नाची साधने निर्माण झाली असून त्यावर टाच येण्याची भीती त्यांनी व्यक्त केली होती. मसाई पठारानजीकच्या १३ गावांचा विरोध असल्याचे पत्र वन विभागाकडे सादर केले असून शासनाच्या नव्या निर्णयास विरोध असल्याचे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्याने सांगितले.

दरम्यान, मसाई पठाराला संवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जादिल्यामुळे इथल्या जैवविविधतेचे संरक्षण होण्यास मदत होणार असल्याचे पर्यावरणप्रेमी व अभ्यासकांनी म्हटले आहे. इथे अनावश्यक बांधकामे, रिसॉर्ट, विश्रामगृहे उभारू नयेत. तसेच, शासनाने पठाराचे संरक्षण करण्यासाठी तत्परतेने निधी द्यावा, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**सूत्र** – *दयानंद लिपारे. 'मसाई पठार संरक्षित राखीव क्षेत्र करण्यास स्थानिकांचा विरोध', www.loksatta.com, १०.०६.२०२२.*

## विदर्भ

### विदर्भासह राज्यात यंदा २४,००० पेक्षा जास्त वणव्याच्या घटनांची नोंद

महाराष्ट्रात या वर्षी सुमारे २४, ५९२ वणव्याच्या घटनांची नोंद झाली आहे. राज्यातील सर्वाधिक वनाच्छादित भाग असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३, अंक २, क्र. ९*) आणि त्या खालोखाल चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक वणव्यांची नोंद झाली आहे.

वणव्यांचा काळ आणिमोह फुले वेचण्याचा, तेंदूपत्ता संकलनाचा हंगाम एकाच वेळी येतात. फुले व पाने संकलनाच्या काळात मोठ्या प्रमाणावर आगीच्या घटना घडतात. हे वनोपज झटपट मिळवण्यासाठी ते वेचणारे बरेचदा आगी लावतात. गावातील गुराखीसुद्धा गुरांसाठी चारा जास्त उगवेल या समजुतीतून गवताला आग लावतात. शेतातील कचरा, पालापाचोळा साफ करण्यासाठी शेतकरी शेतात आग लावतात, आदी विविध कारणांमुळे गावा-शेताजवळील जंगलात आगी लागतात.

२२ मे रोजी नागपूरच्या गोरेवाडा जंगलाला आग लागली. यात तब्बल १.५ चौरस किमी जंगल

जळाले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर पेपर मिलच्या निलगिरी लाकडाच्या वखारीत ३० हजार टन लाकडाची राख झाली. मात्र, ही आग जंगलातील वणव्यामुळे लागली की या आगीमुळे जंगलाला आग लागली, याची चौकशी सुरू आहे.


**सूत्र** – *'मानवी हस्तक्षेपामुळे जंगलात वणव्यांच्या प्रमाणात वाढ; महाराष्ट्रात यावर्षी २४ हजार ५९२ घटनांची नोंद', www.loksatta.com,०५.०६.२०२२.*

## गोंदिया-चंद्रपूर रेल्वेमार्गावर पुन्हा एका व्याघ्रमृत्यू; रेल्वेचे उपाययोजनांकडे दुर्लक्ष

गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगावच्या जंगलात कोरंबी गावाजवळ ११ जून रोजी सकाळी रेल्वे रुळावर वाघाचा मृतदेह आढळून आला. सुमारे पाच वर्षे वयाचा हा वाघ होता. प्राथमिक अहवालात रेल्वेच्या धडकेने वाघाचा मृत्यू झाल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. वडसा मार्गे गोंदिया-नागभीड-चंद्रपूर असा हा रेल्वेमार्ग आहे. दोन वर्षांपूर्वी या मार्गावर वाघाच्या बछड्याचा मृत्यू झाला होता. त्याआधी देखील दोन वाघ इथे मृत्युमुखी पडले होते. खेरीज, बिबट्या, अस्वल अशा अनेक प्राण्यांचा या मार्गावर रेल्वेच्या धडकेने मृत्यू झाला आहे.

२०१८ साली गोंदिया-चंद्रपूर रेल्वेमार्गावर वाघाच्या तीन बछड्यांचा मृत्यू झाल्यानंतर या मार्गावरील वन्यप्राण्यांचे मृत्यू थांबवण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळाने समिती नेमली होती. या समितीच्या अनेक बैठका झाल्या. या मार्गावरील वन्यप्राण्यांचे भ्रमणमार्ग, संवेदनशील क्षेत्र समितीच्या सदस्यांनी स्पष्ट केले. नेमक्या त्रुटी समजून घेत अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी वन विभागाने मध्य रेल्वेच्या नागपूर इथल्या विभागीय व्यवस्थापकांना याबाबत अहवाल सादर केला व त्यात काही सूचना केल्या. या रेल्वेमार्गावर १९ अशी ठिकाणे आहेत, जिथे रेल्वेची गती ४० किमी प्रति तास असायला हवी. ब्रम्हपुरी आणि चंद्रपूर विभागातील मामला, जुनोना, सिंदेवाही, चिचपल्ली, तळोधी, बाळापूर, नागभीड या अतिसंवेदनशील ठिकाणी नवीन भुयारी मार्ग करण्यास सुचवण्यात आले होते.

मात्र, आजतागायत या उपाययोजनांची अंमलबजावणी रेल्वेकडून करण्यात आलेली नाही. या मार्गावरील रेल्वेचा सरासरी वेग अजूनही ६६.५ किलोमीटर प्रति तास आहे. मालगाड्यांव्यतिरिक्त आठ वेळा इतर गाड्याही या मार्गावरुन जातात. वन्यप्राणी रस्ता ओलांडताना दिसल्यास वाहनांचा वेग कमी करावा, शिट्या वाजवाव्या, प्रकाशझोताचा वापर करावा अशा सूचना रेल्वेच्या चालकांना दिल्याचे रेल्वे अधिकारी सांगतात.



**सूत्र** - *'रेल्वेमार्ग वन्यप्राण्यांसाठी जीवभक्षकच; चंद्रपूर-गोंदिया मार्गावर वाघाच्या मृत्यूनंतर पुन्हा मुद्दा चर्चेत', www.loksatta.com, १२.०६.२०२२.*
*राखी चव्हाण. 'रेल्वे रुळावर वाघाचा मृतदेह!; गोंदिया जिल्ह्यातील घटना', www.loksatta.com, ११.०६.२०२२.*

## गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात आफ्रिकी सफारीला केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी

केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण (CZA)ने सफारीसाठी मंजुरी दिल्यानंतर नागपुरातील 'बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालया'त आफ्रिकी सफारी सुरू करण्यासाठी वन विकास महामंडळाने काम सुरू आहे. या सफारीसाठी महाराष्ट्र सरकारने २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३, अंक २, क्र. ९*).

गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात २६ जानेवारी २०२१ ला १२० हेक्टरवर भारतीय सफारीची सुरुवात झाली. आता दुसऱ्या टप्प्यात आफ्रिकी सफारीचे काम सुरू होत आहे. रेखाचित्रे तयार करण्यासाठी वास्तुशिल्प सल्लागार नियुक्त करण्याची प्रक्रिया व लवकरच सुरू केली जाईल. त्यानंतर दोन महिन्यात ही निविदा प्रक्रिया पूर्ण होईल, असे वन विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

६३ हेक्टर परिसरातील भारतीय सफारीजवळच अफ्रिकन सफारी असणार आहे. त्यात सुमारे १३ पिंजरे असतील आणि आफ्रिकेतील प्राण्यांच्या सुमारे २८ प्रजाती ठेवल्या जातील. दुबई सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या प्राणिसंग्रहालयातून अफ्रिकी प्राण्यांच्या प्रजाती आणण्यासाठी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. तसेच या सफारीसाठी भारतातील इतर प्राणिसंग्रहालयातूनही प्राणी आणण्याच्या पर्यायावर विचार केला जात आहे.

**सूत्र** – *'नागपूरमधील आफ्रिकन सफारीचा मार्ग मोकळा ; अर्थसंकल्पात निधीची तरतूद, आराखडाही मंजूर', www.loksatta.com, २५.०४.२०२२.*

## कोकण


### रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर अंकन केलेली कासवे परतीच्या मार्गावर

रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यांवर अंकन केलेली चार ऑलिव्ह रिडले कासवे गुजरात, कर्नाटकची भ्रमंती करून पुन्हा परतीच्या प्रवासाला निघाली आहेत. चारपैकी तीन कासवे एकत्र येण्याची शक्यता 'वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया' (WII)च्या शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

कांदळवन कक्षाने WIIच्या सहकार्याने महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर विणीच्या हंगामात अंडी घालण्यासाठी आलेल्या पाच ऑलिव्ह रिडले कासवांना अंकन करून समुद्रात सोडले होते. पैकी एका कासवाशी संपर्क तुटला. उरलेल्या चारपैकी प्रथमा या कासवाने गुजरातच्या किनाऱ्यावर पोहोचल्यानंतर परतीचा मार्ग स्वीकारत वेळासचा समुद्रकिनारा गाठला. तिची समुद्राच्या आत ८० किलोमीटर खोल भ्रमंती सुरू होती. प्रथमा आता दक्षिणेकडे जाण्याचे संकेत आहेत. सावनी आणि वनश्री ही दोन्ही कासवे महाराष्ट्र व गोव्याच्या सीमा भागातील समुद्र किनाऱ्यांजवळ आहेत. सावनी मालवणच्या किनाऱ्यापासून लांब अंतरावर व वनश्री दक्षिणेकडील समुद्राच्या भागात कमी वेगाने जात आहे. रेवा हे कासव गोव्याच्या दिशेने समुद्रात जात असल्याचे दिसून येत आहे.

रेवा आणि वनश्री ही कासवे एकमेकींच्या जवळ असून प्रथमा व सावनी ही कासवे रेवाकडे येऊ शकतात, असासंशोधकांचा अंदाज आहे. (सविस्तर घटनाक्रमासाठी पाहा : *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३, अंक २, क्र. ९*)

**सूत्र** – *'सॅटेलाईट टॅग' केलेली कासवे एकाच मार्गावर; गुजरात, कर्नाटक भ्रमंतीनंतर परतीचा प्रवास', www.loksatta.com, १८.०५.२०२२.*



## माणूस-बिबट्या संघर्ष

**अहमदनगर जिल्ह्यात माणूस-बिबट्या संघर्षाच्या ९८९ प्रकरणांत वन खात्याकडून ९४ लाखांची भरपाई**

अहमदनगर जिल्ह्यात एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ याकालावधीत बिबट्यांच्या हल्ल्यांत ८३९ पाळीव जनावरे आणि दोन व्यक्ती ठार झाल्या. माणूस-बिबट्या संघर्षाच्या एकूण ९८९ प्रकरणांत वन विभागाने ९४ लाख २० हजार १७२ रुपयांची भरपाई संबंधितांना दिली आहे.

दोन मृत व्यक्तिंच्या कुटुंबांना भरपाईदाखल एकूण २० लाख रुपये देण्यात आले. कोपरगाव व पारनेर तालुक्यांत जिवीतहानीच्या घटना जास्त आहेत. बिबट्यांच्या हल्ल्यांतकोपरगावात १०, राहुरीत तीन, तिसगावात एक, श्रीगोंदे इथे दोन, अहमदनगरात तीन, पारनेर इथे दोन, पाथर्डीत तीनअसे एकूण २४ जण जखमी झाले आहेत. जखमींना दहा लाख ७२ हजार ७७२ रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

पशुहानीच्या घटनांमध्ये कोरगावात २१८, राहुरीत २३६, टाकळीढोकेश्वर इथे १८, तिसगावात १५, श्रीगोंद्यात ५१, कर्जत इथे ३३, अहमदनगरमध्ये ११५, पारनेरमध्ये १४७, पाथर्डीत सहा पाळीव पशुंचा समावेश आहे.

बिबट्यांना जेरबंद करण्याकरता अनेक गावांतून पिंजरा लावण्याची मागणी होत आहे. मात्र, बिबटे जास्त व पिंजरे कमी, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**सूत्र** – *'बिबट्याची डरकाळी भीतिदायक',*
*www.esakal.com, २४.०६.२०२२.*

## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त


| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | कन्नड | पिशोर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याच्या नऊ बकऱ्या ठार; परिसरातील पाळीव जनावरांवर गेल्यादोन महिन्यांतील आठवा हल्ला | ईसकाळ, १९.०५.२०२२ |
| चंद्रपूर | चंद्रपूर | दुर्गापूर परिसरात१६ जणांवर हल्ले करणारा बिबट्या जेरबंद | लोकसत्ता, १३.०५.२०२२ |
| जळगाव | रावेर | मंगरूळ गावाजवळ बिबट्याच्या हल्ल्यात गुराखी गंभीर जखमी | ईसकाळ, १६.०६.२०२२ |
| नाशिक | नाशिक | धोंडेगावात बिबट्याच्या हल्ल्यात साडेसहा वर्षीय मुलीचा मृत्यू | लोकसत्ता, २९.०४.२०२२ |
| | नाशिक शहर | आडगावात बिबट्याच्या हल्ल्यात पाच वर्षीय मुलगा गंभीर जखमी | ईसकाळ, ०६.०७.२०२२ |
| | त्र्यंबकेश्वर | धुमोडी इथे बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षीय मुलीचा मृत्यू | ईसकाळ, ०५.०७.२०२२ |
| पुणे | आंबेगाव | वडगाव काशिंबेग इथे शिकार केलेली शेळी घेऊन जाणाऱ्या बिबट्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू | ईसकाळ, ११.०७.२०२२ |
| | | लौकी इथे बिबट्याच्या हल्ल्यात गाय ठार; १५ दिवसांत चार हल्ले | ईसकाळ, १०.०७.२०२२ |
| | जुन्नर | खामगावात बिबट्याच्या हल्ल्यात तीन गायी व एक म्हैस ठार | ईसकाळ, १०.०७.२०२२ |
| | दौंड | उंडवडीत बिबट्याच्या हल्ल्यात पाच शेळया ठार | ईसकाळ, १०.०७.२०२२ |

## व्याघ्र हल्ल्यातील मनुष्यहानी संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| गडचिरोली | आरमोरी | अरसोडा गावाजवळ शेतात काम करणाऱ्या महिलेचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू | ईसकाळ, १३.०५.२०२२ |
| | गडचिरोली | पोर्ला वनपरिक्षेत्रात जळाऊ लाकूड आणण्याकरता राखीव जंगलात गेलेल्या युवकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू | ईसकाळ, २७.०६.२०२२ |
| चंद्रपूर | चिमूर | केवाडा-गोदेडा वन परिसरात तेंदू पाने संकलनासाठी गेलेल्या दाम्पत्यावर वाघाचा हल्ला; पत्नी मृत व पती गंभीर जखमी | लोकसत्ता, २४,२५.०५.२०२२ |
| | ब्रह्मपुरी | हळदा गावात दोन दिवसांच्या अंतराने वाघांच्या हल्ल्यांत दोन शेतमजुरांचा मृत्यू | लोकसत्ता, १४.०६.२०२२ |
| | मूल | काटवन परिसरात इथे वाघाच्या हल्ल्यात शेतमजूर ठार | लोकसत्ता ३१.०२.२०२२ |
| | भद्रावती | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सीतारामपेठ जंगलात तेंदू पाने संकलनासाठी गेलेली महिला वाघाच्या हल्ल्यात ठार | ईसकाळ, १५.०५.२०२२ |

## राष्ट्रीय बातम्या

**संरक्षित वन क्षेत्रास एक किलोमीटरचे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र हवे : सर्वोच्च न्यायालय**



संरक्षित वन क्षेत्रास एक किलोमीटरचे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (ESZ) असावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने ३ जून रोजी दिले.

विद्यमान ESZ क्षेत्र हे एक किलोमीटर संरक्षित क्षेत्राबाहेरील मोकळ्या जागेच्या पलीकडे विस्तारित असल्यास किंवा कोणत्याही वैधानिक साधनाने उच्च मर्यादा निश्चित केल्यास, अशी विस्तारित मर्यादा प्रचलित असेल, असेही न्यायालयाच्या आदेशात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने टी. एन. गोदावर्मन थिरुमलपद प्रकरणात दाखल केलेल्या अर्जावर हे निर्देश दिले. त्यात प्रत्येक राज्याच्या मुख्य वनसंरक्षकांना ESZ मधील विद्यमान संरचनांची यादी तयार करून तीन महिन्यांच्या कालावधीत न्यायालयाला अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

अनेकदा खाणकाम करता यावे यासाठी ESZ जाहीर केले जात नाही, जाहीर झाले तरी एक किमी क्षेत्र राहात नाही किंवा अशा संवेदनशील क्षेत्रात खाणींना परवानगी देण्यात येते. या पार्श्वभूमीवर हा निर्णय वने आणि वन्यजीव संरक्षणासाठी मोलाचा राहील, असे मत पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. तसेच, यापूर्वी जाहीर झालेल्या ESZ बाबत सकारात्मक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे; ही प्रक्रिया संपूर्ण भारतात सुलभ व्हावी म्हणून न्यायालयाने वेळोवेळी सूचना केल्या होत्या; त्यांची काटेकोर अंमलबजावणी होईल, असे नियोजन असणे आवश्यक आहे, असे राज्याच्या वन्यजीव मंडळाच्या एका सदस्यांनी म्हटले आहे.

**सूत्र -** *'संरक्षित जंगलात पर्यावरण संवेदनशील क्षेत्र आवश्यक; सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश', www.loksatta.com, ०६.०६.२०२२.*

**“व्याघ्र संचारमार्गाची संलग्नता टिकवण्यासाठी भागीदारांच्या हितांविषयी संतुलन आवश्यक”**

एकमेकांपासून लांब असलेल्या विविध व्याघ्र अधिवासांमध्ये वाघांच्या जनुकीय देवाणघेवाण व्याघ्रसंचारमार्गांमुळे सुलभ होते. ‘नेटवर्क फॉर कॉन्झर्विंग सेंट्रल इंडिया’ (NCCI)चा व्याघ्र संचारमार्ग संलग्न क्षेत्रावरील शोधनिबंध ‘कॉन्झर्वेशन बायोलॉजी’ या संशोधन पत्रिकेत प्रकाशित झाला आहे. त्यामध्ये हे निरीक्षण नोंदवले आहे.

‘रस्ते पर्यावरण’ (road ecology) या विषयावरील प्रदीर्घ अभ्यासानंतर शास्त्रज्ञ व वन्यजीव तज्ज्ञांनी मध्य भारतातील वाघांच्या संचारमार्गांच्या महत्वाबाबत वरील निरीक्षण नोंदवले आहे.

वाघांच्या संचारमार्गाची संलग्नता टिकवून ठेवण्यासाठी वन्य प्राण्यांचे सुरक्षित मार्ग, स्थानिक समुदायांच्या जीवनावश्यक गरजा, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी संभाव्य स्पर्धात्मक उद्दीष्टे यांच्यातील योग्य संतुलनावर एकमत आवश्यक आहे. या व्यवस्थापन परिणाम विश्लेषणाचे नेतृत्त्व करणाऱ्या डॉ. अमृता नीलकांतन यांनी हे मत व्यक्त केले आहे.

**सूत्र** – *‘मध्य भारतातील वाघांसाठीच्या संचार मार्गाबाबत शास्त्रज्ञांचे एकमत ;‘कॉन्झर्वेशन बायोलॉजी’मध्ये रस्ते पर्यावरणावरील अभ्यास प्रकाशित’, www.loksatta.com, २७.०४.२०२२.*

**तमिळनाडूत पालींच्या तीन नव्या प्रजातींचा शोध**


तमिळनाडूत पालींच्या तीन नव्या प्रजातीआढळल्या आहेत. ‘ठाकरे वाइल्डलाईफ फाउण्डेशन’चे तेजस ठाकरे, अक्षय खांडेकर आणि इशान अगरवाल यांच्या संशोधनातून समोर आलेल्या या प्रजातींविषयीचा शोधनिबंध ‘व्हर्टिब्रेट झुऑलॉजी’ या संशोधन पत्रिकेत जून महिन्यात प्रकाशित झाला आहे.

या तिन्ही पाली ‘नेमॅस्पीस’ जातीच्या असून त्यांची प्रजाती नामे ‘अळगू’, ‘कलकडेनसीस’ आणि ‘मुंदाथुराईएनसीस’ आहेत. शरीराचा रंग, खवल्यांची संख्या, तसेच इतर शारीरिक वैशिष्ट्ये आणि जनुकीय विश्लेषणाच्या आधारावर या तिन्ही प्रजाती नवीन असल्याचे सिद्ध झाले आहे. या संशोधनामुळे पश्चिम घाटातील नेमॅस्पीस प्रजातींची संख्या ४७ झाली आहे.

**सूत्र** - *‘तमिळनाडूत तीन नव्या पालींचा शोध; ठाकरे वाइल्डलाईफ फाऊंडेशनचे यश’, www.loksatta.com, २२.०६.२०२२.*

## आंतरराष्ट्रीय बातम्या

**जगभरात पक्ष्यांच्या ४८ टक्के प्रजातींचे अस्तित्व धोक्यात; भारतातील पक्ष्यांची स्थितीही गंभीर**



‘स्टेटस ऑफ द वर्ल्डस् बर्ड्स्’ या अभ्यासातील नोंदींनुसार, जगभरात अस्तित्वात असलेल्या पक्ष्यांच्या प्रजातींपैकी सुमारे ४८ टक्के प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या कमी होत आहे. केवळ सहा टक्के प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या वाढती आहे; तर सात टक्के प्रजातींबाबत निष्कर्ष काढण्यासाठी पुरेशी माहिती नाही.

मँचेस्टर मेट्रोपॉलिटनविद्यापीठ, कॉर्नेल विद्यापीठ, बर्डलाईफ इंटरनॅशनल, जोहान्सबर्ग विद्यापीठ, पॉन्टिफिकल झेव्हियरियन विद्यापीठ आणि नेचर कॉन्झर्वेशन फाउण्डेशन आणि भारतातील सशोधकांच्या सहभागाने हा अभ्यास करण्यात आला.

यामध्ये जगातील पक्ष्यांच्या११,००० प्रजातींमध्ये होणारे बदल अभ्यासण्यात आले. त्यासाठी ‘इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर’

(IUCN) 'रेड लिस्ट' अर्थात नाहीसे होण्याचा धोका असलेल्या प्रजातींच्या श्रेणीनिहाय यादी व भारतातील पक्ष्यांविषयी माहितीसाठी सरकारी व बिनसरकारी अशा १० संस्थांच्या भागीदारीतून फेब्रुवारी २०२० मध्ये प्रकाशित करण्यात आलेल्या 'स्टेटस ऑफ इंडियाज् बर्ड्स्' अहवालातीलनिरीक्षणांचा आधार घेण्यात आला.

उष्णकटिबंधीय जंगलांबरोबरच, नैसर्गिक गवताळ प्रदेश विशेष धोक्यात असलेला अधिवास म्हणून समोर आला आहे. उत्तर अमेरिका, युरोपसह भारतातीलगवताळ प्रदेशातील पक्ष्यांमध्ये मोठी घट झाली आहे.

भारतातील ८० टक्के प्रजातींचे पक्षी नाहीसे होत आहेत;तर ५० टक्के प्रजातींच्या पक्ष्यांची संख्या वेगाने कमी होत आहे.भारतातील पाणथळ भागातील ४७ टक्के, गवताळ प्रदेशातील ५९ टक्के व जंगलातील ६२ टक्के प्रजातींचे पक्षी नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत.

**सूत्र** – *'जागतिक स्तरावर पक्ष्यांच्या संख्येत सातत्याने घट; अधिवासाचे नुकसान, जमिनीचा अतिवापर कारणीभूत'*, *www.loksatta.com*, *११.०५.२०२२*.

## Three distinctive books from the *PA Update* stable

The set of 3 available for a special discounted priceof Rs. 1000


Get a comprehensive view of conservation and protected area management issues from across India


News, information and perspective collated from 25 years of publishing the


*Protected Area Update*

1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line-drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, pls write to psekhsaria@gmail.com**



## थोडक्यात पण महत्त्वाचे...

### माळढोक - असून अडचण, नसून खोळंबा !

सोलापूर जिल्ह्यातील नान्नज माळढोक अभयारण्य धोकाग्रस्त वन्यजीव अधिवास म्हणून घोषित करण्यात आले आहे. साहाय्यक वनसंरक्षक दिलीप वाकचौरे त्यासाठी जुलै महिन्यात सोलापुरात येऊन गेले. माळढोक अभयारण्य ज्या परिसरात आहे तिथल्या नरोटेवाडी गावात ग्रामसभाही घेण्यात आली. तीत याविषयी चर्चा झाली. मुद्दा आहे तो माळढोक पक्ष्याचा. गतवर्षी झालेल्या माळढोक पक्ष्याच्या गणनेमध्ये या परिसरात फक्त एक नर माळढोक असल्याचे दिसून आले आहे. हा पक्षी एका जागी थांबत नाही. तो स्थलांतर करीत असतो. अशा स्थितीत अभयारण्यातील माळढोकची संख्या वाढणार कशी? श्री. वाकचौरे सांगतात, “आम्ही कृत्रिम फलन घडवून आणू.” मादी उपलब्ध नसेल तर कृत्रिम फलन करणार कसे? शिवाय हा एका जागी न राहणारा पक्षी आहे. ही प्रक्रिया कशी घडवून आणणार?

माळढोक पक्ष्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील अनेक विकासकामे होत नाहीत. सोलापूरपासून जवळच होऊ घातलेल्या बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी माळढोक अभयारण्याचा हवाला देऊन काम थांबवले आहे. दुसरीकडे, याच भागातून सुरत ते चेन्नई राष्ट्रीय महामार्ग जाणार आहे. त्यासाठी जमीन संपादन जोरात सुरू आहे. ही जमीन अर्थातच माळढोक अभयारण्य म्हणून घोषित केलेल्या परिसरातील आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा ‘ड्रीम प्रोजेक्ट’ म्हणून सुरत-चेन्नई मार्गाकडे पाहणार आणि सोलापूरकरांच्या विकासासाठी उपयुक्त असलेला आंतरराष्ट्रीय विमानतळ मात्र एका माळढोकाचे कारण सांगून डब्यात टाकणार... वास्तविक, विमानतळासाठी सुमारे एक हजार एकर क्षेत्र संपादित करण्यात आले आहे. तिथे कंपौंडवॉल टाकण्यात आली आहे. पण कामकाज मात्र ठप्प आहे.

माळढोकाची संख्या वाढली पाहिजे, यात दुमत नाही. पण विकास आणि पक्षीसंरक्षण यांचा समन्वय साधण्याची आवश्यकता आहे. विरोधाभास असा की, नान्नज आणि परिसरातील जमिनींच्या खरेदीविक्रीचे व्यवहार जोरात सुरू आहेत. या भागात खाणी आहेत. महामार्गाच्या कामासाठी खडी पाठवण्याचे काम नान्नज अभयारण्यात असलेल्या खाणींमधून उत्खनन करूनच केले जाते. त्याला रीतसर परवानगी दिलेली आहे. फक्त विमानतळाला परवानगी नाकारली आहे, हे काय गौडबंगाल आहे ते कळायला मार्ग नाही.

महत्त्वाचे म्हणजे, अभयारण्यात पक्षीच नसेल तर अभयारण्यच नाहीसे होईल, या भाबड्या संकल्पनेतून अनेक स्थानिक रहिवासी माळढोक दिसला की त्याची हत्या करून त्याचे मांस खात आहेत. त्यामुळे स्थानिकांकडूनच पक्ष्याला धोका आहे. मग, कृत्रिम फलन किंवा अन्य मार्गाने माळढोकाची संख्या वाढवण्याचा प्रयत्न केला तर लोक त्याला जिवंत ठेवणार नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. माळढोक अभयारण्याचे नेमके किती आणि कोणते फायदे आहेत, हे स्थानिक लोकांना नीट समजावून सांगितल्याशिवाय हे प्रकार टळणार नाहीत आणि माळढोकही वाढणार नाहीत. धोकाग्रस्त, अतिसंवेदनशील वगैरे गोष्टी ठीक आहेत, पण लोकांचा विश्वास संपादन करणे हेच प्रमुख आव्हान आहे, यात शंका नाही.

- **रजनीश जोशी**
निवासी संपादक, तरुण भारत संवाद, सोलापूर
joshirajanish@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004